वाचले:-१) मे. आय.एस.सी. इन्फ्राबिल्ड एल.एल.पी तर्फे कुंलमितसिंग छाबरा व इतर, क्रियेटिव्ह प्रॉपर्टीज तर्फे गगनप्रीत कौर छाबरा, व इतर, आय.एस.सी. बिल्डकॉन प्रा. लि. तर्फे भागीदार अमितेश कौर छाबरा व इतर यांचे तर्फे कुलमुखत्यार धारक मे. डोरीया होम्स एल.एल. पी. तर्फे भागीदार श्री. विश्वजित सुभाष झंवर रा. एस २ द मेट्रोपोल, आयनॉक्स शेजारी बंडगार्डन रोड पुणे ०१ यांचा दिनांक २८/०८/२०१४ रोजीचा अर्ज.

२) मा. आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचेकडिल परिपत्रक क्र. मह-२/जमीन/आरआर/७७२/०३, दिनांक २२/०९/२००३.

३) सहा. संचालक नगर रचना पुणे यांनी जा.क्र./ रेखांकन/ एनएबीपी/मौ.उंड्री/ता.हवेली/स.नं.५६/८ व ५६/९/ससंपु/८१५२, दिनांक ३१/१२/२०१४

४) महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र. टीपीएस/१८१०/२०५१/सीआर २४३१/२०१०/युडी-१३, दिनांक ११/०१/२०१२ रोजीची अधिसुचना.

५) महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र.नाजक २२११/प्र.क्र.१३८/नाजकधा-२ दिनांक ०७/०६/२०११

६) या कार्यालयाकडील क्र. पमह/एनए/एसआर/७४९/२०१३, दिनांक ०४/०७/२०१४ रोजीचा अकृषिक परवानगी आदेश

७) या कार्यालयाकडील क्र. पमह/एनए/एसआर/६५१/२०१४, दिनांक २४/०९/२०१४ रोजीचा अकृषिक परवानगी आदेश

८) भारत सरकार, पर्यावरण व वन विभाग, पर्यावरण भवन, सीजीओ कॉम्पलेक्स, लोधी रोड नवी दिल्ली यांचेकडील नोटीफिकेशन क्र. F. No.१-४/२०१२-RE (Pt.) दिनांक १३/११/२०१३

९) संचालक, महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस, मुंबई यांचेकडील पत्र क्र. एमएफएस/५१/२०१४/४४०, दिनांक ०७/१०/२०१४ रोजीचा ना हरकत दाखला.

१०) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४

११) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे नियम १८

---

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
(महसुल शाखा) (सी.जे./२०१४)
क्र.पमह/एनए/एसआर/८७५/१४
पुणे, दिनांक - २१/०२/२०१५

विषय:- सुधारीत + वाढीव रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगीबाबत...

मौजे उंड्री, ता. हवेली, जि. पुणे येथील स.नं. ५६/८ मधील एकुण २६३००.०० चौ.मी. क्षेत्रावर देणेत आलेल्या अकृषिक परवानगी क्षेत्रामध्ये स.नं. ५६/९ मधील २६४००.०० चौ.मी. क्षेत्र नव्याने समाविष्ठ करून एकुण ५२७००.०० चौ.मी. क्षेत्रा पैकी प्रादेशिक योजनेतील रस्ता रुंदीखालील क्षेत्र ७१४५.८५ चौ.मी. वजा जाता उर्वरित ४५५५४.१५ चौ.मी. पैकी २६३००.०० चौ.मी. क्षेत्रावर निवासी प्रयोजनार्थ सुधारीत बांधकाम नकाशांना व १९२५४.१५ चौ.मी. वाढीव क्षेत्रावर निवासी प्रयोजनाकरिता महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषिक परवानगी देवून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ अन्वये सुधारीत+वाढीव रेखांकन/बांधकाम नकाशांना मंजूरी देणेबाबत...

**आदेश,**

मौजे उंड्री, ता. हवेली, जि. पुणे येथील स.नं. ५६/८ मधील एकुण २६३००.०० चौ.मी. क्षेत्रावर देणेत आलेल्या अकृषिक परवानगी क्षेत्रामध्ये स.नं. ५६/९ मधील २६४००.०० चौ.मी. क्षेत्र नव्याने समाविष्ठ करून एकुण ५२७००.०० चौ.मी. क्षेत्रा पैकी प्रादेशिक योजनेतील रस्ता रुंदीखालील क्षेत्र ७१४५.८५

चौ.मी. वजा जाता उर्वरित ४५५५४.१५ चौ.मी. पैकी २६३००.०० चौ.मी. क्षेत्रावर निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ नुसार सुधारीत बांधकाम नकाशांना व १९२५४.१५ चौ.मी. वाढीव क्षेत्रावर निवासी प्रयोजनाकरिता महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषिक परवानगी देवून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ अन्वये रेखांकन/बांधकाम नकाशांना मंजूरी मिळावी म्हणून दिनांक २८/०८/२०१४ रोजी अर्जदार मे. आय.एस.सी. इन्फ्राबिल्ड एल.एल.पी तर्फे कुलमितसिंग छाबरा व इतर, क्रियेटिव्ह प्रॉपर्टीज तर्फे गगनप्रीतकौर छाबरा, व इतर, आय.एस.सी. बिल्डकॉन प्रा. लि. तर्फे भागीदार अमितेश कौर छाबरा व इतर यांचे तर्फे कुलमुखत्यार धारक मे. डोरीया होम्स एल.एल. पी. तर्फे भागीदार श्री. विश्वजित सुभाष झंवर रा. एस २ द मेट्रोपोल, आयनॉक्स शेजारी बंडगार्डन रोड पुणे ०१ यांनी या कार्यालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे.

मौजे उंड्री ता. हवेली येथील जमीन स.नं. ५६/८ पै. मधील १३१५०.०० चौ.मी. क्षेत्रापैकी प्रादेशिक योजनेतील प्रस्तावित रस्ता रुंदीखालील क्षेत्र ३२८.८९ चौ.मी. वजा जाता उर्वरित १२८२१.११ क्षेत्रावर निवासी प्रयोजनार्थ या कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/एनए/एसआर/७४९/२०१३, दि. ०४/०७/२०१४ अन्वये अकृषिक परवानगीसह बांधकाम नकाशांना परवानगी देणेत आलेली आहे.

तसेच स.नं. ५६/८ पै. मधील १३१५०.०० चौ.मी. क्षेत्रावर निवासी प्रयोजनार्थ या कार्यालयाकडील आदेश क्र.पमह/एनए/एसआर/६५१/२०१४, दिनांक २४/०९/२०१४ अन्वये अकृषिक परवानगीसह बांधकाम नकाशांना परवानगी देणेत आलेली आहे. प्रकरणी एकुण २६३००.०० चौ.मी. क्षेत्रावर अकृषिक परवानगी दिलेली आहे.

आता अर्जदार यांनी मौजे उंड्री, ता. हवेली, जि. पुणे येथील स.नं. ५६/८ मधील एकुण २६३००.०० चौ.मी. क्षेत्रावर देणेत आलेल्या अकृषिक परवानगी क्षेत्रामध्ये स.नं. ५६/९ मधील २६४००.०० चौ.मी. क्षेत्र नव्याने समाविष्ठ करून एकुण ५२७००.०० चौ.मी. सुधारीत + वाढीव क्षेत्रावरील निवासी प्रयोजनार्थ अकृषिक परवानगीसह रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

विषयांकीत क्षेत्रावरील अर्जदार यांनी सादर केलेल्या बांधकाम नकाशांना सहा. संचालक नगर रचना पुणे यांनी त्यांचेकडील जा.क्र./ रेखांकन/ एनएबीपी/मौ.उंड्री/ता.हवेली/स.नं. ५६/८ व ५६/९/ ससंपु/८१५२, दिनांक ३१/१२/२०१४ नुसार मंजूरीची शिफारस केलेली आहे.

मौजे उंड्री, ता. हवेली, जि.पुणे येथील विषयांकित मिळकतींचे सादर अभिलेखांवरून खालील प्रमाणे क्षेत्र हक्कनोंदणीस दाखल असल्याचे दिसुन येत आहे.

| अ.क्र. | जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | ७/१२ नुसार एकुण क्षेत्र (चौ.मी) | बिनशेती करावयाचे क्षेत्र (चौ. मि.) |
|---|---|---|---|---|
| १ | क्रियेटिव्ह प्रॉपर्टीज | ५६/८ | २६३००.०० | १३१५०.०० |
| | आय. एस. सी. इन्फ्राबिल्ड एल. एल. पी | | | १३१५०.०० |
| २ | आय.एस.सी. बिल्डकॉन प्रा. लि. तर्फे संचालक आमितेष कौर, कुलमितसिंग छाबरा, गगनप्रितकौर जमितसिंग छाबरा | ५६/९ | २६४००.०० | २११२०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नियानी होम्स एल.एल. पी. तर्फे भागीदार अमजद कासमभाई अक्कलकोटकर | | | ५२८०.०० |
| | **एकूण क्षेत्र** | | ५२७००.०० | **५२७००.००** |
| २ | अर्जदार यांनी रेखांकन नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र | | | ५२७००.०० |
| ३ | (-) प्रादेशिक योजनेतील रस्ता रुंदीखालील क्षेत्र | | | ७१४५.८५ |
| ४ | (-) यापुर्वीचे अकृषिक परवानगीचे निव्वळ क्षेत्र | | | २६३००.०० |
| ५ | **वाढीव समाविष्ठ अकृषिक परवानगीचे क्षेत्र** | | | **१९२५४.१५** |
| ६ | **बिनशेती करावयाचे प्रयोजन (वाढीव + सुधारीत)** | | | **निवासी** |

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या सर्व हक्कनोंद उतारे, वन विभागाकडील राखीव वनाची यादी, व कार्यालयातील ॲलिनेशन रजिस्टर मधील नोंदी यावरुन दिसून येते की,

१) विषयांकीत क्षेत्रावर. मुळ मालक यांना मालकी हक्क हे फेरफार क्र. ९९०९, ९९३७, १०३२८ नुसार खरेदीने प्राप्त झालेले आहेत. तर अर्जदार यांचे मालकी हक्क हे कुलमुखत्यार पत्राने प्राप्त झालेले असुन त्यांनीच सुधारीत + वाढीव रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे.

२) या कार्यालयाकडील उपलब्ध ॲलिनेशन रजिस्टरमधील नोंदी पहाता सदर जमीन ही इनाम/ वतन संवर्गातील नसल्याचे दिसून येते.

३) वनसरंक्षक, पुणे वन विभाग, पुणे यांनी या कार्यालयास दिनांक १४ मे, २००९ रोजी सादर केलेली यादी व सीडी तपासली असता प्रस्तुत क्षेत्र राखीव किंवा खाजगी वन संज्ञेत येत नाही.

४) सहा. संचालक नगर रचना विभाग पुणे यांचेकडील दिनांक ३१/१२/२०१४ रोजीचे शिफारशीमधील जागा पाहणी अहवालानुसार, सदर जागेस १०.०० मी. रूंद पोच रस्ता उपलब्ध असून प्रादेशिक योजनेनुसार २४.०० मी. रूंद रस्ता लगत आहे. जागा सर्वसाधारणपणे सपाट असून पुर्णपणे मोकळी आहे. तसेच जागेवर पुर्वमंजुरीनुसार बांधकाम सुरू नसलेबाबत नमुद केले आहे.

५) भारत सरकार, पर्यावरण व वन विभाग, पर्यावरण भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली यांचेकडील क्र. F. No. १-४/२०१२-RE (Pt.), दिनांक १३/११/२०१३ रोजीचे Direction under Section ५ of Envionment (Protection) Act, १९८६ चे नोटीफीकेशननुसार सदरचे गाव हे Ecologically Senetive Area (ESA) चे यादीत समाविष्ठ नाही.

६) युएलसीबाबत अभिप्राय -

नागरी जमिन (कमाल धारणा व विनियम) अधिनियम, १९७६ निरसित करण्यात येऊन शासनाने नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ दिनांक २९/११/२००९ पासुन स्विकृत केलेला आहे. शासनाचे नगरविकास विभागाकडील पत्र क्र.नाजक-१० (२००८) /प्र.क्र.१/ २००८/ नाजकधा-१, दिनांक ०१ मार्च, २००८ अन्वये कलम १०(३)/१०(५)/२० व २१ अंतर्गत करण्यात आलेली कार्यवाही वगळता अन्य कलमांतर्गत झालेल्या कार्यवाहीबाबत ना.ज.क.धा. अधिनियमांतर्गत परवानगी आवश्यकता नाही. तथापि, जमीन धारकाकडुन/विकासकाकडुन विक्री अथवा विकसन परवानगी

मागीतलेल्या मिळकती संदर्भात निरसन अधिनियमाच्यां संरक्षित कलमांतर्गत त्यांच्या मिळकती संदर्भात कार्यवाही झालेली नाही, या आशयाचे शपथपत्र व बंधपत्र रु. ३००/- स्टॅम्पपेपरवर घेण्यात येऊन जमिनीचे हस्तांतरण व विकसनास परवानगी देण्यात यावी अशी सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार अर्जदार यांनी विहित नमुन्यातील शपथपत्र व बंधपत्र रु. ३००/- चे स्टॅम्पपेपरवर दिनांक ३०/०१/२०१५ रोजी सादर केलेले आहे. सादर केलेल्या शपथपत्र व बंधपत्रानुसार विषयांकित मिळकतीबाबत विवरणपत्र दाखल केले नसल्याचे नमूद करून त्यामध्ये प्रश्नाधिन स.नं. ५६/८ व ५६/९ मौजे उंड्री, ता. हवेली येथील ५२७००.०० चौ.मी. क्षेत्र हे अतिरीक्त नसल्याचे प्रतिज्ञापित केले आहे. अर्जदार यांनी युएलसी कार्यालयाकडील आय.डी. नंबर असलेली कोणतीही यादी सादर केलेली नाही.

प्रस्तुत मिळकतीबाबत युएलसी कायद्यातंर्गत अर्जदार यांनी विवरणपत्र दाखल केले होते काय? तसेच कलम १०(३), १०(५) अन्वये कार्यवाही केलेल्या यादीमध्ये तसेच कलम २० अन्वये सुट दिलेल्या, कलम २१ खालीलं योजनांचे यादीत सदर जमिनीचा समावेश आहे काय? तसेच प्रकरणामध्ये कलम ८ (४) अन्वये निर्णय होऊन अतिरिक्त क्षेत्र निरंक घोषित केले असलेस सदरचे प्रकरण आपल्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे काय? याबाबतची माहिती २० दिवसामध्ये अभिप्राय सादर करणेबाबत युएलसी कार्यालयास पत्र क्र.पमह/ एनए/ एस आर/८७५/२०१४ दिनांक ०१/०९/२०१४ अन्वये कळविणेत आलेले होते. सद्यस्थितीमध्ये सदरचे पत्र युएलसी कार्यालयास पाठवून २० दिवसापेक्षा अधिक कालावधी होऊनही युएलसी कार्यालयाकडील अभिप्राय प्राप्त झालेला नाही.

तथापि या कार्यालयाकडे पुणे नागरी समुह कार्यालयाने त्यांचेकडील पत्र क्र.युएलसी/सीए-२/ १६१९/२००७, दिनांक ०१/११/२००७ अन्वये पुणे नागरी समुहातील साविष्ठ गावातील ज्या सर्व्हे/गट क्रमांकाच्या क्षेत्रासाठी युएलसी कायदा कलम ६ अन्वये विवरणपत्र दाखल होऊन कलम १०(३), १०(५) अन्वये कार्यवाहीबाबतची यादी व सीडी या कार्यालयास पाठविलेली आहे. त्या यादी व सीडीनुसार प्रश्नाधिन मिळकत त्यामध्ये समाविष्ठ नसल्यचे दिसून येत आहे.

याबाबत शासनाचे नगर विकास विभागाचे पत्र क्र.नाजक-२२११/प्र.क्र.१३८/नाजकधा-२, दिनांक ०७/०६/२०११ नुसार ज्या प्रकरणी युएलसी कायदा कलम १०(३), १०(५) नुसार ज्या प्रकरणी युएलसी कायदा कलम १० (३) व १० (५) नुसार कार्यवाही झालेली नाही अथवा ती प्रलंबित आहे त्याच प्रकरणी युएलसी/नागरी समूहाकडून अभिप्राय अथवा ना हरकत घेण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच प्रश्नाधिन मिळकतीबाबत आदेश पारीत झाल्यावर देखिल पडताळणीसाठी आदेशाची प्रत पुणे नागरी समुह यांचे कार्यालयाकडे पाठविणेत येणार आहे.

तसेच दिनांक ०३ मे, २०११ रोजीचे युएलसीकडुन प्राप्त झालेली यादी व शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ७ जुन, २०११ रोजीचे पत्रानुसार, सीआयडीकडील पत्रे, ३० संदिग्ध प्रकरणांची यादी व बनावट/बोगस आदेशांची यादी पाहता विषयांकित जमीनीचा त्यामध्ये समावेश नाही.

मा. आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडिल परिपत्रक क्र.मह-२/जमीन/जनरल/आरआर/ ७७२/ २००३, दिनांक २२/९/२००३ मधील तरतुदीनुसार अर्जदार यांनी दिनांक ३०/०१/२०१५ रोजीचे विहित नमुन्यातील नोटराईज्ड करुन प्रतिज्ञापत्र व क्षतिपत्र सादर केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये विषयांकित

जमिनीबाबत खालील नमुद केलेल्या कोणत्याही कायदयाच्या तरतुदीचा भंग झालेला नाही असे विशद केले आहे.

१. मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८.
२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.
३. महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९७६.
४. इनाम जमीनी खालसा करण्यासाठीचे निर्गमित केलेले विविध कायदे.
५. मुंबई तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे व जमीन एकत्रिकरण करणे अधिनियम, १९४७.
६. महाराष्ट्र खाजगी वने संपादन अधिनियम, १९७५.
७. महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या जमिनी प्रत्यार्पित करणे अधिनियम, १९७४.
८. नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, १९७६.
९. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम, १९८६.

उपरोक्त नमुद कायदयातील तरतुदीचा भंग होत नसलेचे तसेच विषयांकित जमीन भोगवटादार वर्ग-२ पैकी नसलेचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे.

अर्जदार यांनी नव्याने समाविष्ठ निवासी प्रयोजनार्थ १९२५४.१५ चौ.मी. क्षेत्रासाठी रू. ०.१०/- रु. पै. प्रति चौ.मी. या दराने बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी र. रू. १९२५/-, रुपांतरीत कराची रक्कम रू. ९६२५/-, जिल्हा परिषद कर १३४७५/- व ग्रामपंचायत कर १९२५/- अशी एकुण र. रु. २६९५०/- दिनांक ११/०२/२०१५ व मोजणी फी रक्कम रू. २०००/- दिनांक ११/०२/२०१५ रोजी शासकीय कोषागार अधिकारी पुणे येथे जमा करून त्याबाबतचे चलन सादर केले आहे.

वरील परिस्थिती विचारात घेता, अर्जदार यांची निवासी प्रयोजनार्थ सुधारीत + वाढीव रेखांकन/ बांधकाम नकाशांना मंजूरी मिळणेची विनंती मान्य करणेस हरकत नाही. म्हणून, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ नियम १८ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना प्रदान करणेत आलेल्या शक्तीनुसार मी सौरभ राव, जिल्हाधिकारी पुणे अर्जदार मे. आय.एस.सी. इन्फ्राबिल्ड एल.एल.पी तर्फे कुलमितसिंग छाबरा व इतर, क्रियेटिव्ह प्रॉपर्टीज तर्फे गगनप्रीतकौर छाबरा, व इतर, आय.एस.सी. बिल्डकॉन प्रा. लि. तर्फे भागीदार अमितेश कौर छाबरा व इतर यांचे तर्फे कुलमुखत्यार धारक मे. डोरीया होम्स एल.एल. पी. तर्फे भागीदार श्री. विश्वजित सुभाष झंवर रा. एस २ द मेट्रोपोल, आयनॉक्स शेजारी बंडगार्डन रोड पुणे ०१ यांना मौजे उंड्री, ता. हवेली, जि. पुणे येथील स.नं. ५६/८ मधील एकुण २६३००.०० चौ.मी. क्षेत्रावर देणेत आलेल्या अकृषिक परवानगी क्षेत्रामध्ये स.नं. ५६/९ मधील २६४००.०० चौ.मी. क्षेत्र नव्याने समाविष्ठ करून एकुण ५२७००.०० चौ.मी. क्षेत्रा पैकी प्रादेशिक योजनेतील रस्ता रुंदीखालील क्षेत्र ७१४५.८५ चौ.मी. वजा जाता उर्वरित ४५५५४.१५ चौ.मी. पैकी २६३००.०० चौ.मी. क्षेत्रावर निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ नुसार सुधारीत बांधकाम नकाशांना व १९२५४.१५ चौ.मी. वाढीव क्षेत्रावर निवासी प्रयोजनाकरिता महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषिक परवानगी देवून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ अन्वये रेखांकन/बांधकाम नकाशांना सहा. संचालक नगर रचना पुणे यांचेकडील जा.क्र./ रेखांकन/ एनएबीपी/मौ.उंड्री/ता.हवेली/स.नं.५६/८ व

५६/९/ ससंपु/ ८१५२, दिनांक ३१/१२/२०१४ अन्वये केलेल्या शिफारसीस अधिन राहून खालील कोष्टकात नमुद मिळकतीवर खालील अटी व शर्तीस अधिन राहून परवानगी देत आहे.

**सुधारीत + वाढीव रेखांकन/बांधकाम परवानगी मंजुर करावयाच्या जमिनीचे वर्णन**

| अ. क्र. | जमीनीचे मुद्दे | जमीनीबाबतचा तपशिल |
|---|---|---|
| १ | गावाचे नाव | मौजे उंड्री, ता- हवेली |
| २ | सर्व्हे नंबर | ५६/८ व ५६/९ |
| ३ | अर्जदार यांनी रेखांकन नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र | ५२७००.०० |
| ४ | (-) प्रादेशिक योजनेतील रस्ता रुंदीखालील क्षेत्र | ७१४५.८५ |
| ५ | (-) यापुर्वीचे अकृषिक परवानगीचे निव्वळ क्षेत्र | २६३००.०० |
| ६ | **नव्याने समाविष्ठ अकृषिक परवानगीचे क्षेत्र** | **१९२५४.१५** |
| ७ | **बिनशेती करावयाचे प्रयोजन** | **निवासी** |

**सुधारीत + वाढीव रेखांकन/बांधकाम आराखडयातील नकाशांचा तपशिल**

| **नकाशा क्र.** | **नकाशाचा तपशिल** |
|---|---|
| १/२० | एकत्रीकरण नकाशां, क्षेत्रविवरण तपशिल. |
| २/२० | लेआऊट नकाशा, स्टिल्ट लेवल पार्किंग नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| ३/२० | पार्किंग नकाशा,. साईट प्रोफाईल सेक्शन |
| ४/२० | (विंग ए, बी, ई, के व एन) चा बांधकाम मजला नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| ५/२० | (विंग ए, बी, ई, के व एन) चा १३ व १४ वा मजला बांधकाम नकाशा, टेरेस नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| ६/२० | (विंग ए, बी, ई, के व एन) चा सेक्शन, इलेव्हेशन |
| ७/२० | (विंग सी व एम) चा बांधकाम मजला नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| ८/२० | (विंग सी व एम) चा १३ व १४ वा मजला बांधकाम नकाशा, टेरेस नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| ९/२० | (विंग सी व एम) सेक्शन, इलेव्हेशन |
| १०/२० | (विंग जे) चा बांधकाम नकाशा, सेक्शन, इलेव्हेशन, टेरेस नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| ११/२० | (विंग क्यू व एस) चा बांधकाम मजला नकाशा, सेक्शन, इलेव्हेशन, टेरेस नंकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| १२/२० | (विंग आर) चा बांधकाम मजला नकाशा, सेक्शन, इलेव्हेशन, टेरेस नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल. |
| १३/२० | (विंग पी, एफ) चा बांधकाम नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| १४/२० | (विंग पी, एफ) चा १३ व १४ वा मजला बांधकाम नकाशा, टेरेस नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| १५/२० | (विंग डी, एल) बांधकाम मजला नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| १६/२० | (विंग डी एल) बांधकाम नकाशा मजला नकाशा, टेरेस नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| १७/२० | (विंग पी, एफ, डी व एल) चा सेक्शन, इलेव्हेशन |
| १८/२० | (विंग जी व एच) बांधकाम मजला नकाशा, टेरेस नकाशा, क्षेत्रविवरण तपशिल |
| १९/२० | (विंग जी व एच) चा सेक्शन व इलेव्हेशन |
| २०/२० | (मोकळया जागेतील क्लब हाऊस) चा बांधकाम मजला नकाशा, टेरेस नकाशा, सेक्शन, इलेव्हेशन, क्षेत्रविवरण तपशिल. |

## अटी व शर्ती

१) सदरची परवानगी ही महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे नियम १८ व त्याखालील नियमान्वये देणेत येत आहे.

२) रेखांकनातील भुखंड/इमारती या रहिवास याप्रमाणे अनुज्ञेय केलेल्या कारणांसाठीच वापरणे बंधनकारक असुन बांधकाम मंजुर नकाशानुसार असणे आवश्यक आहे. तसेच मोकळया जागेतील इमारतीचा वापर क्लब हाऊससाठी सार्वजनिकरित्या करणे आवश्यक आहे.

३) विषयांकित जमिनीवर कोणतेही विकास कार्य सुरू करण्यापुर्वी हे रेखांकन जागेवर आखुन भूमि अभिलेख विभागाकडून प्रमाणित करून घ्यावे लागेल. रेखांकन जागेवर आखलेवर, भुखंडाचे किमान क्षेत्रफळ, नकाशावर दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. तसेच रस्त्यांची रूंदी १५% सुविधा जागा व १०% खुल्या जागेचे क्षेत्र मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता उपयोगी नाही. यांमध्ये काही फेरफार झाल्यास अभिन्यास पुन्हा मंजूर करून घ्यावा लागेल. अशा प्रमाणित रेखांकनाची प्रत नगर रचना विभाग व या कार्यालयाकडे सादर करून त्यास अंतिम मंजूरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करणेत येऊ नये.

४) सुधारित बांधकामातील मजल्यांची संख्या, उंची मंजुर रेखांकन/बांधकाम नकाशांवर दर्शविल्यापेक्षा जास्त असता कामा नये.

५) सुधारीत रेखांकनातील रस्ते, गटारे खुली जागा इत्यादी अर्जदारांनी भुखंड/सदनिका वितरीत करण्यापुर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

६) अभिन्यासातील रस्ते व खुली जागा यांची देखभाल अर्जदाराने करावयास हवी. अन्यथा ते देखभाल करण्यासाठी सुयोग्य प्राधिकरणाच्या ताब्यात द्यावेत. या जागा व रस्ते सर्व जनतेच्या वापरासाठी खुले असतील. तसेच रस्ते शेजारच्या जमीन मालकास वापरण्यास खुले ठेवणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

७) रेखांकन नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील, मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्षात जागेवर उपलब्ध असली पाहिजेत व त्याखालील जागा कायमस्वरूपी खुली ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

८) सुधारित बांधकामाचे क्षेत्र, भुखंडावर अन्य बांधकाम धरून एकुण क्षेत्र, सुविधा क्षेत्र व प्रादेशिक योजना रस्ते/ रस्तारुंदीक्षेत्र वगळता उर्वरीत निव्वळ क्षेत्राच्या बांधकाम नकाशावरती दर्शविले इतके प्रत्यक्ष जागेवर कमाल राहिले पाहिजे.

९) सुधारीत इमारती मध्ये १/१० रूमच्या क्षेत्रा इतके वायुविजन उपलब्ध होणे आवश्यक राहील.

१०) सुधारित इमारतीसाठी / विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याची सोय व सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यवस्था नसल्यास, प्रत्यक्ष वापरापुर्वी अर्जदाराने केली पाहिजे.

११) सुधारित बांधकामात मंजूरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१२) प्रस्तावासोबत मोजणी दिनांक ०८/०७/२०१४, मो.र.नं. ९८२२/२०१४, व दिनांक १४/१०/२०१४, मो.र.नं. ३१५४/२०१३ ने केलेल्या वहीवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे आधिन राहून सदरची शिफारस करणेत येत आहे. विषयाधीन जमीनीची वहीवाट / हददीचे अनुषंगाने काही वाद /

न्यायालयीन वाद उद्भवलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहिल व अशा प्रकरणी परवानगी आदेश आपोआप रद्द होईल.

१३) सुधारीत बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणाच्याही वहीवाटीचे हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार/मालकाने घेतली पाहीजे.

१४) विषयांकित रेखांकन व बांधकाम नकाशांची छाननी प्रस्तावासोबत उपलबध असणा-या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे. (उदा. ७/१२ उतारे, कुळमुखत्यारपत्र, संम्मतीपत्र, मोजणी नकाशा इ.) या कागदपत्रांच्या अधिकृततेबाबत व अद्यावत नोंदीबाबत अर्जदार / मालक जबाबदार राहतील.

१५) विषयांकित बांधकाम नकाशाची छाननी, अनुज्ञेय चटई क्षेत्र, भुव्याप्त क्षेत्र याबाबतीत केलेली आहे. बांधकाम नकाशातील गणितीय चुका वा जागेवर बांधकाम नकाशावर नमुद केल्या व्यतिरिक्त जादा बांधकाम असल्यास त्यास संबंधित वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील.

१६) स्टिल्ट भविष्यात बंदिस्त करण्यात येऊ नये. तसेच स्टिल्टचा वापर फक्त पार्किंगसाठीच करण्यात यावा.

१७) प्रादेशिक योजनेतील २४.०० मी. रूंद रस्त्याने/रस्तारुंदीने बाधीत क्षेत्र सार्वजनिक वापरासाठी कायमस्वरूपी खुले ठेवणे आवश्यक राहील व समुचित प्राधिकरणाने सदर रस्त्याखालील जागा मागणी केल्यानंतर नाममात्र रू. १/- किंमतीने विनातक्रार, संबंधित प्राधिकरणाच्या ताब्यात देणे अर्जदारावर बंधनकारक राहील. अस्तित्वातील रस्त्याखालील क्षेत्राचा चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होणार नाही.

१८) विषयांकित मिळकतीवर या पुर्वी या कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/ एनए/ एसआर/७४९/ २०१३, दि. ०४/०७/२०१४ व आदेश क्र.पमह/एनए/एसआर/६५१/२०१४, दिनांक २४/०९/२०१४ नुसार बांधकाम नकाशांना देणेत आलेली परवानगी रद्द समजणेत यावी. परंतु सदर आदेशातील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

१९) सादर प्रस्ताव हा समुहगृह बांधणी योजना प्रकारातील असुन रस्ता / रस्तारूंदीकरणाखालील क्षेत्र, सुविधा क्षेत्र वजा जाता उर्वरित क्षेत्राच्या ०.९० इतके निव्वळ क्षेत्र विचारात घेतले आहे. भविष्यात रस्ता / रस्तारूंदीकरणाखालील क्षेत्र, हंस्तातरणायोग्य सुविधा क्षेत्र शासनास हस्तांरीत करून त्या क्षेत्राचा चटई क्षेत्र अपेक्षिलेस अनुज्ञेय होईल.

२०) रेन वॉटर हार्वेस्टिंग बाबतची यंत्रणा अर्जदार यांनी इमारतीचे वापरापुर्वी स्वखर्चाने करावयाची आहे.

२१) सौर उर्जेवर पाणी तापविण्यासाठीची यंत्रणा अर्जदार यांनी स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच शक्यतर सौर उर्जेवर रस्त्याच्या लगतचे पथदिवे बसविण्याचे आहेत.

२२) वेस्ट वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्ट यंत्रणा स्वखर्चाने अर्जदार यांनी करावयाची आहे. व पाण्याचा फेर वापर बगीचा, झाडाची जोपासना यासाठी करणे आवश्यक आहे.

२३) विघटन होणाऱ्या ओल्या कचऱ्यासाठी गांडूळखत प्रकल्प अर्जदार यांनी स्वखर्चाने करावयाची आहे.

२४) शासन नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र. टिपीव्ही- ४३०८/४१०२/ प्र. क्र. ३५९/०८/नवि-११ दि. १९/११/२००८ नुसार बांधकाम नकाशामध्ये प्रत्येक सदनिकेचे एकूण चटईक्षेत्र नमूद केलेले आहे. याबाबत गणितिय चुका इ. बाबत वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील.

२५) उक्त प्रस्तावामध्ये समाविष्ठ स.नं. ५६/८ व ५६/९ मधील क्षेत्र ५२७००.०० चौ.मी. या एकत्रित क्षेत्रावर प्रकरण सादर आहे. सदरचे एकत्रीकरण हे नियोजनाचे दृष्टीने दर्शविलेले आहे. सबब उक्त स.नं. मधील क्षेत्रामध्ये एकत्रीकरण बाबतची सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन त्यानुसार आवश्यक ती नोंद महसुल दप्तरी होऊन तसा नोंदीबाबतचा ७/१२ उतारा/मोजणी नकाशा सादर करणे अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील.

२६) सदर भूखंडाचे बांधकाम क्षेत्रफळ ५००.०० चौ.मी. पेक्षा जास्त आहे त्यामुळे प्रत्येक ८०.० चौ.मी. क्षेत्रासाठी एक झाड या प्रमाणे वृक्षलागवड करणे व जोपासना करणे बंधनकारक राहील.

२७) प्रस्तुत प्रकरणातील जमीनीवर कोणतेही बांधकाम सुरु केले नंतर जोते तपासणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय पुढील बांधकाम करता येणार नाही. व सदरचे बांधकाम पूर्ण झालेनंतर वापर सुरु करणेपूर्वी भोगवटा प्रमाणपत्र घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार कारवाईस पात्र राहील.

२८) पुर्व मंजुरीप्रमाणे विकासक/जागा मालक यांनी काही सदनिका बाबत नोंदणीकृत करार केले असल्यास सदर करार धारकास उक्त सुधारीत मंजुरीबाबत अवगत करणेची व मुळ करारानुषंगाने कायद्यानुसार आवश्यक त्या सर्व बाबाची पुर्तता करणेची संपुर्ण जबाबदारी विकासक/जागा मालक यांची राहील. व त्यानुसार पुर्तता व्हावी लागेल. सुधारीत मंजुरीबाबत करारधारकाकडून काही आक्षेप घेतल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी विकासक / जागा मालक यांची राहील व सुधारीत मंजुरीची शिफारस रद्द समजणेत येईल. त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२९) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूद क्र. ६.२.६.१ नुसार विशेष (१५ मी. पेक्षा जास्त उंचीच्या) इमारतीबाबत -

a) प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. १२.६ (b) नुसार प्रस्तावित इमारतीस भोवताली ६ मी. रुंदीचे पाथवे किमान ४५ टन वजनांचे फायर इंजिनचा भार पेलु शकेल याप्रमाणे डिझाईन करुण विकसीत करणेची जबाबदारी विकासकर्त्याची / अर्जदाराची राहील.

b) अर्जदारांनी प्रस्ताविल्यानुसार सर्व उंच इमारती स्टिल्ट वर असणे आवश्यक राहील त्याचबरोबर वाहनतळ सुविधा प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुद क्र. १६.१ नुसार प्रस्तावित करणे आवश्यक राहील.

c) नगर विकास विभागाच्या दि. २८.८.२००९ रोजीच्या अधिसुचना प्रमाणे नियम क्र. ४ मधील टीप - ii प्रमाणे संचालक, महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस, मुंबई यांनी १५ मी. पेक्षा उंच इमारतीच्या नियोजनातील जिन्याचे लिफ्टचे स्थान मान्य केलेले आहे. तथापि या कार्यालयाकडून मंजूरीसाठी शिफारस केलेल्या या बाबतचे नियोजनानुसार इमारतीचे नियोजनात बदल करणे आवश्यक झाल्यास पुन्हा सुचालक यांची मंजुरी घ्यावी लागेल. तसेच प्रत्येक इमारतीमधील एक स्टेअरकेस व एक लिफ्ट NBC मधील तरतुदीप्रमाणे फायर रेजिस्टन्ट असणे आवश्यक आहे. तसेच उंच इमारतीचे नियोजना अनुषंगाने संचालक, महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस, मुंबई यांचेकडील पत्र क्र.

एमएफएस/५१/२०१४/३७८, दिनांक ०९/०९/२०१४ ने दिलेल्या Provisional Fire N.O.C. मधील अटी / शर्ती ची पूर्तता करणे अर्जदारांवर बंधनकारक राहिल.

d) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र. ६.२, ६.१ नुसार बाबींची पुर्तता तसेच अग्निप्रतिबंधकन उपाययोजनाबाबत भाग-४ मधील बाबींची पुर्तता करणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

e) नेहमीच्या वापराशिवाय अग्निप्रतिबंधक व्यवस्थेकरीता, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, सांडपाणी, कचरा विल्हेवाट इत्यादी बाबींची पुर्तता अर्जदाराने स्वखर्चाने, स्वजबाबदारीवर करणे आवश्यक राहील.

f) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र. १८ नुसार लिफ्टची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

g) अशा विकासासाठी इमारतीचे Structural Stability बाबत शासनाच्या नोंदणीकृत Structural Engineer चे प्रमाणपत्र अर्जदाराने आपले कार्यालयात व या कार्यालयात दाखल करणे आवश्यक राहील.

h) विकसकाने जोत्यापर्यंतचे बांधकाम केल्यानंतर सहा. संचालक नगररचना पुणे यांना कळविणे आवश्यक आहे. जोत्यापर्यंतच्या बांधकामाना सहा. संचालक नगररचना पुणे यांनी प्रमाणित केल्यानंतरच पुढील बांधकाम करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

i) अशा इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे व असे भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी सर्व:- अग्नीशनम यंत्रणेची पूर्तता व वर नमुद अटींची पूर्तता होणे आवश्यक राहील.

j) विषयाधीन जागेवर, विषयाधीन जमिनीचा स.नं./ग.नं. निहाय तपशिल, जमिन मालकाचे नाव, विकासकाचे नाव, वास्तुशिल्पीचे नाव, बिनशेती परवाना क्रमांक इत्यादी आशय दर्शविणारा योग्य आकाराचा फलक लावणे आवश्यक राहील.

k) संचालक महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस, मुंबई यांनी पत्र क्रमांक एमएफएस/५१/२०१४/४४०, दिनांक ०७/१०/२०१४ अन्वये ना हरकत दाखला व सोबतचे नकाशे सांक्षाकीत केलेले आहेत. सदचे नकाशे प्रस्तावित इमारत नकाशे यामध्ये अंतर्गत फेरबदल केलेले आहेत. या नियोजनास संबंधित संचालक यांचे सुधारित ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. सुधारित ना हरकत प्रमाणपत्र मंजुरिशिवाय बांधकाम केल्यास ते अनाधिकृत धरण्यात येईल.

३०) सदर प्रकल्पातील नियोजित बांधकाम विकासासाठी वास्तुविशारद / स्ट्रक्चरल इंजिनिअर/ साईट इंजिनिअर/ विकासक श्री. राजेश मलकानी, रजिस्टर क्रमांक (PMC L. No - ४१२) यांनी दिनांक १५/१२/२०१४ रोजी रू. २००/- स्टॅम पेपरवर सादर केलेले असून त्यामध्ये त्यांनी नमूद केल्यानुसार नियोजित बांधकामाचे स्थिरतेबाबत, बांधकामाबाबतचा दर्जा व गुणवत्तेबाबत संपुर्ण जबाबदारी वास्तुविशारद / स्ट्रक्चरल इंजिनिअर/ साईट इंजिनिअर/ विकासक यांची राहील.

३१) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूद क्र. ६.२.११ नुसार उपरोक्त क्षेत्रासाठी सुरक्षा अनामत ठेव जमा करणेबाबत तरतूद आहे. तथापि, याबाबतचे दर व कार्यपध्दती शासनाकडून विहीत करण्यात आलेली नसल्यमुळे अर्जदारांनी सदर बंधपत्राव्दारे शासनाकडून उपरोक्त सुरक्षा अनामत ठेव रक्कमेबाबतचे दर व कार्यपध्दती विहीत झाल्यानंतर अर्जदार

सदरची सुरक्षा अनामत ठेव रक्कम विना तक्रार त्वरीत भरण्यास तयार असल्याचे हमीपत्र दिनांक ०५/०९/२०१४ मध्ये नमुद केलेले आहे. सदरचे हमीपत्र अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३२) विषयांकित प्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेले एकुण (Gross FSI + Non FSI) बांधकाम क्षेत्र ८०२२५.७२ चौ.मी. आहे. सबब, अर्जदार यांनी पर्यावरण विभागाकडील State Enviornment Impact Assessment Authority कडून Enviornment Clearance प्रमाणपत्र प्राप्त केलेखेरिज बांधकाम/विकासास सुरूवात करता येणार नाही. सदरची अट प्रकल्पाचे अर्जदार/ मालक/ विकासक व वास्तुविशारद यांचेवर बंधनकारक राहील. तसेच पर्यावरण विभागाकडील परिपत्रक क्र. SEIAA-२०१४/CR-०२/TC-३, दिनांक ३०/०१/२०१४ मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे प्रकल्पाचे अर्जदार/मालक/विकासक व वास्तुविशारद यांचेवर बंधनकारक राहील. त्यानुसार **"सदरचे बांधकाम नकाशे हे पर्यावरण विभागाकडील Environment Clearance प्रमाणपत्र मिळणेस अधिन राहून मंजुर करणेत आले आहेत. प्रस्तुत प्रमाणपत्र मिळाले शिवाय प्रत्यक्ष जागेवर बांधकाम/विकास करता येणार नाही."** तसेच प्रस्तुतबाबत अर्जदार यांनी दिनांक २९/०१/२०१५ रोजी सादर केलेला इंडेम्निटी बॉन्ड अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३३) प्रस्तुत प्रकरणी विकसक यांनी नमुद मिळकतीवरील बांधकामाचा दर्जा, गुणवत्ता व स्ट्रक्चरल स्टॅबीलीटी बाबत व मजबुतीबाबत २०० रू. चे स्टॅम्प पेपरवर दिनांक २९/०१/२०१५ रोजी प्रतिज्ञापत्र / हमीपत्र सादर केले असुन त्यास अधिन राहून सुधारीत बांधकाम नकाशांना मंजुरी देणेत येत आहे.

३४) प्रस्तुत जमिनीबाबत दिवाणी, फौजदारी व इतर स्वरूपाचा दावा चालू असले तर सदर न्यायालयाचा निर्णय संबंधितावर बंधनकारक राहतील.

३५) अर्जदार यांनी सादर केलेली माहिती व कागदपत्रांबाबत व त्यांच्या सत्यतेबाबत संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांची राहील.

३६) वरील अटी व शर्तीचे पालन करणे यांची संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांची राहील.

जिल्हाधिकारी पुणे

**(सौरभ राव)**
**जिल्हाधिकारी, पुणे**

प्रति,

मे. डोरीया होम्स एल.एल. पी. तर्फे भागीदार,
श्री. विश्वजित सुभाष झंवर रा. एस २ द मेट्रोपोल,
आयनॉक्स शेजारी बंडगार्डन रोड पुणे ०१